ॐ

# ज्ञान प्रबोधिनी

## सौर अग्रहायण १९४० चे

## मासिक वृत्त

**सौर पौष १, शके १९४० दि. २२/१२/२०१८**

### मा. संचालकांचे प्रश्नोत्तर-रूप चिंतन

**प्रश्न :** विद्याव्रत पूर्वतयारीच्या व्याख्यानांमध्ये नैतिक विकासावरती स्वतंत्र व्याख्यानाची योजना आपण का करत नाही?

**उत्तर :** 'व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत' पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या वेळी मी यासंबंधी काय विचार केला होता ते सांगतो. धार्मिक किंवा नैतिक किंवा मूल्यांचे शिक्षण देण्यासाठी वेगळे तास, किंवा वेगळा वेळ किंवा वेगळे उपक्रम योजायचे नाहीत अशी प्रबोधिनीची शैक्षणिक भूमिका आहे. विद्यार्थ्यांचे सर्व शैक्षणिक जीवनच नीती शिकवणारे, मूल्य रुजवणारे झाले पाहिजे अशी भूमिका आहे. त्यामुळे नैतिक विकासावरचे वेगळे व्याख्यान योजण्याचा विचार केला नव्हता. नैतिक शिक्षण म्हणजे मार्गदर्शक, शिक्षक किंवा विद्याव्रत प्रेरकांकडून त्यांच्या वागण्यातून विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्यांचे संक्रमण.

विद्याव्रत संस्कार व व्याख्यानमालेची रचना झाली तेव्हा प्रबोधिनीतच वर्षभर पूर्ण वेळ शिकणारे विद्यार्थी डोळ्यांसमोर होते. आता विद्याव्रत संस्काराचा प्रसार होत असताना अनेक शाळांमध्ये प्रबोधिनीतल्या विद्याव्रत प्रेरकांचा विद्यार्थ्यांशी काही दिवसांचे काही तासच संपर्क येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे व्यक्तिगत संबंध निर्माण व्हायला वेळेची मर्यादा पडते. व्यक्तिगत संबंधाशिवाय मूल्यांचे संक्रमण होऊ शकत नाही. त्यामुळे नैतिक विकासाचे व्याख्यान तरी घेऊया अशी कल्पना कोणाला तरी सुचली असावी.

आपले विद्याव्रत प्रेरक विविध शाळांमधल्या विद्यार्थ्यांशी अनौपचारिकतेने वागतात. थोड्या संपर्कातूनही ठिकठिकाणचे विद्यार्थी त्यांच्या नेहमीच्या शिक्षकांपेक्षा प्रबोधिनीच्या प्रेरकांना जास्त उत्स्फूर्त प्रतिसाद देतात. त्यामुळे इतर शाळांमधले शिक्षकही विद्यार्थ्यांच्या वर्तन समस्यांवरचा उपाय म्हणून त्यांचा प्रश्न आपल्या गळ्यात घालण्यासाठी नैतिक विकासावर व्याख्यान योजण्याची सूचना करतात. मला ही अशी सूचना अनेक ठिकाणी तेथील शिक्षक-मुख्याध्यापकांनी केली आहे. प्रतिसाद म्हणून मी त्यांना आपली नैतिक शिक्षणाची भूमिका सांगत आलो आहे.

नैतिक विकासावरती वेगळे व्याख्यान योजायचे नाही तर मग एकूण व्याख्यानमालेत या विषयाचा अप्रत्यक्षपणे उल्लेख होतो का? माझ्याकडच्या जुन्या टिपणांप्रमाणे १) मन पवित्र सुदृढ करणे, २) 'बुद्धीचे दशपैलू'मधील कार्य-अकार्य-विवेकबुद्धी हा पैलू, आणि ३) इंद्रियसंयमन व चांगल्या सवयींची शक्ती मिळवणे, या तीन व्याख्यानांमध्ये विद्याव्रत पूर्वतयारीच्या वेळी नैतिक विकासाच्या मुद्द्यांना स्पर्श होतो. बोलणाऱ्याच्या वागण्यामधून त्याच्यात जी नैतिक शक्ती निर्माण झालेली असते तिचाच परिणाम ऐकणाऱ्यावरती होतो, बोलण्याचा नाही. त्यामुळे माझ्या मते तीन व्याख्यानांमधून या विषयाला होणारा स्पर्श पुरेसा आहे.

काळाच्या ओघात व्याख्यानांची संख्या व शीर्षके बदलत गेली आहेत. प्रत्येक वक्ता स्वतःचे काही मुद्दे व उदाहरणांची भर घालत असतो. त्यामुळे पूर्वीच्या रचनेतले काही मुद्दे सुटून गेले असतील, तर पुन्हा एकदा सर्व मुद्द्यांचा आढावा घ्यावा. मूळ शैक्षणिक भूमिका लक्षात घेऊन वेगळ्या व्याख्यानाचा उपयोग होतो की नाही याचा स्थानिक स्तरावर प्रयोग करून पाहायला हरकत नाही. व्याख्यानमालेचा हेतू माहिती देणे नसून व्रतपालनाची प्रेरणा निर्माण करणे हा आहे एवढे लक्षात ठेवावे.

गिरीश श्री. बापट
संचालक

### विस्तार केंद्र, अंबाजोगाई

सौर अग्रहायण १० (१ डिसें.) रोजी विवेकवाडी परिवार, डोंबिवली यांच्यातर्फे ''पाण्याची गोष्ट'' हा कार्यक्रम मुलुंड (मुंबई) येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पाणी फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. सत्यजित भटकळ, ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. श्री. सुभाषराव देशपांडे, ज्ञान प्रबोधिनी अंबाजोगाईचे श्री. प्रसाद चिक्षे, जल संधारणाचे काम केलेल्या शिंगणवाडी, निमला, व्हरकरवाडी, डोळा पिंपळगाव व दीपेवडगाव येथील गावकरी उपस्थित होते. सर्वांनी पाण्याच्या कामातील आलेले अनुभव व गोष्टी सांगितल्या.

प्रसाददादा यांच्या सहा वर्षातील पाण्याच्या कामातील अनुभवावर आधारित ''पाण्याची गोष्ट'' व डोंबिवलीकरांच्या अनुभवाची पुस्तिका यांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला एकूण ४०० जणांची उपस्थिती होती.

### संत्रिका

सौर अग्रहायण १९ (१० डिसें.) रोजी 'सक्षम' पुणे या संस्थेच्या वतीने आयोजिलेल्या 'दिव्यांग सामूहिक विवाह सोहळा ' कार्यक्रमात माधुरी करवडे यांनी विवाह संस्कारातील कन्यादान, नातिचरामि ची शपथ घेणे, अक्षतारोपण, सप्तपदी, इ.विषयी वधुवरांना माहिती दिली. विवाह संस्कारासाठी आठ जोडपी होती. यातील काही जण अंध, पायाने अधू असे होते. या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनीची विवाह संस्कार विषयक भूमिका नवीन गटासमोर मांडता आली.



(उपक्रमांची प्रकाशचित्रे पान क्र. ७ व ८ वर)

## आर्त रूप तू ...

कालवा फुटला अशी बातमी सगळीकडे पसरली. मिडिया वरून अनेक चित्रफिती येऊ लागल्या आणि मदतीला अनेक हात सरसावले. दांडेकर वस्ती म्हणजे आपल्याजवळच!! नैसर्गिक आपत्तीला इतर राज्यात सुद्धा धावून जातो मग इथे तर गेलेच पाहिजे. तात्पुरती प्रासंगिक मदत करणारे अनेक जण असतात पण नंतर कोणी फिरकत नाही असे चित्र साधारण दिसते. त्यामुळे आपण तात्कालिक मदतीला जाण्याऐवजी थोडे नियोजनपूर्वक जाऊ असे ठरवले.

सर्व्हे नंबर १३३, सिंहगड पेट्रोल पंपासमोर असलेल्या दांडेकर वस्तीमध्ये भेटी देऊन आपल्या नागरी वस्ती अभ्यास गटाच्या मदत कार्याला सुरुवात झाली. ज्यांची घरे पडली त्यांना लगेच मदत मिळाली पण ज्यांच्या घरात पाणी तीनचार तास होते त्यांचे धान्य, कपडे, भांडी असे बरेच नुकसान झाले; त्यांना मदतीची गरज आहे हे आपल्या कार्यकर्त्यांनी हेरले आणि कामाला सुरुवात झाली. वस्तीमध्ये हिंडून रीतसर अर्ज भरून कपडे, पांघरूण, भांडी, वह्या, पुस्तके, अशी नित्य गरजांची यादी तयार झाली.

सुहृदांना आवाहन करून या वस्तू गोळा केल्या. एका सुहृद व्यक्तीने ५० किलो चिवडा व ५० किलो लाडू दिवाळीनिमित्त दिले. प्रत्येक पिशवीमध्ये १ धान्याचे किट, साडी, अर्जामध्ये असलेल्या मुलांचे, पुरुषांचे कपडे, उपलब्ध असल्यास भांडी व पांघरूण असे सामान भरले होते. प्रत्येक अर्जाची छाननी करून त्याप्रमाणे वस्तू एकत्र करून पिशव्या भरल्या आणि त्यांना नावे चिकटवली. या व्यतिरिक्त खाऊचे पुडे बांधणे. अर्जाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या वस्तूंची पिशवी बनवणे, तसेच वस्तू वाटपाच्या दिवशी वस्तू वाटणे अशा स्वरूपाची मदत वीस स्वयंसेवकांनी केली.

सौर कार्तिक १३ (४ नोव्हें.) च्या आदल्या दिवशी सर्व लोकांना फोन करून निरोप दिला गेला. लोकांचे दोन गट करून पहिला गट १० ते १ तर दुसरा गट २ ते ५ या वेळात बोलवला होता. आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा फोटो व आधार कार्ड घेऊन पुढे पाठवले जात होते. सर्व पिशव्यांवर चिठ्या लावल्या असल्यामुळे वाटप चटकन झाले. पिशवी दिली की सामान मिळाल्याची सही घेतली गेली. वस्तूबरोबर खाऊचा पुडा आणि दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. व्यवस्थित नियोजन केले असल्यामुळे आणि आपल्याला नक्की सामान मिळणार ही खात्री असल्यामुळे कुठेही गोंधळ न होता सर्व कार्यकम नीट पार पडला. साधारण १२० गरजूंना वाटप झाले. त्यानंतर सर्व्हे नं. १३४ आणि २१४ मधल्या अर्ज भरलेल्या इतरांनाही पुढच्या दोन आठवड्यात साहित्याचे वाटप झाले. पहिल्या हप्त्यात २०८ तर दुसऱ्या हप्त्यात १३५ जणांना अशी एकूण ३४३ जणांना साधारण रु. २,५०,०००/-एवढ्या किमतीची मदत केली गेली.

मदतीला धावून जाणे हा तर आपला स्थायीभाव आहे, पण ज्या इतर वस्तीत आपण काम करतो तिथले युवक युवती या कामात सहभागी होते हे जास्त महत्त्वाचे!! या वस्तीत आपण ज्यांना मदत करण्यासाठी धडपड केली, ज्या महिला मदत घेण्यासाठी प्रबोधिनी पर्यंत पोचल्या त्यांना एकत्र आणणे आणि संघटन वृत्ती वाढवणे यासाठी सौर पौष २ (२३ डिसें.) रोजी प्रबोधिनीत चालणाऱ्या सावित्री दलाबरोबर एक स्नेह मेळावा योजला आहे.

देणारे आणि घेणारे दोन्ही हातांची सांगड घालण्याचे काम आपण करतच असतो. जन नोहे जनार्दन असे म्हणत असताना पाटील वस्तीत लागलेल्या आगीत नुकसान झालेल्यांना हात द्यायचा हे पुढचे आव्हान स्वीकारून गट परत नव्या दमाने वस्तीत जाऊन गरजा जाणून घ्यायचा प्रयत्न करत आहे.

---

## स्त्री शक्ती प्रबोधन (शहरी)

**संवादिनी विकासिका गट :** प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया हे पद्य प्रबोधिनीशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला माहिती होते आणि त्याचीच दुसरी ओळ समर्थ मायभूमीला जगी करावयाला ही ओळ या विद्यार्थ्यांनी साध्य करायची असेल तर त्या दिशेने त्यांची वाटचाल होण्यासाठी त्यांचे व्यक्तिमत्त्व फुलले पाहिजे. ह्याच विचाराने ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन (शहरी) संवादिनीच्या विकासिका गटाच्या कार्यकर्त्या प्रयत्नशील असतात, हाच हेतू मनात धरून लोणी (पुणे) येथील कन्या प्रशालेतल्या सातवीच्या १६० विद्यार्थिनींसाठी ❊समर्थ मुली समर्थ मायभूमी❊ असा चार तासांचा मेळावा घेतला. मेळाव्याच्या विषयाला सार्थ अशा प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया ह्या पद्याने सुरुवात झाली.

पहिल्या सत्रात सहा विषयांची मांडणी झाली १) आहार हा विषय मांडताना आहाराच्या पध्द्ती, पौष्टिक आहाराचे फायदे, जंक फुडचे तोटे यावर चर्चा झाली. २) स्वच्छतेविषयी बोलताना मी पासून आम्ही पर्यंत शारीरिक, मानसिक, सामाजिक स्वच्छता यावर मांडणी केली. ३) प्रसारमाध्यमांचे फायदे तोटे, त्याचा सुयोग्य किंवा अतिरेकी वापर कसा होऊ शकतो यावर रोल प्ले आणि उदाहरणे देत चर्चा झाली. ४) एक चित्र दाखवून निरीक्षण करायला सांगितले. निरीक्षणाचा उपयोग का, कसा, कशाकरिता होऊ शकतो याबद्दल मांडणी केली. ५) निर्णयकौशल्य आणि निर्णयाचे महत्त्व, का कधी, कुठे, कसा घ्यायचा यावर चर्चा झाली ६) मी पासून आम्ही पर्यंत म्हणजे स्वतःपासून देशापर्यंत सुरक्षा कशी घ्यायची आणि किती महत्वाची हे समजावून सांगितले. गटातील प्रत्येकी दोन मुलींनी विषयांचे सादरीकरण केले. नंतरच्या सत्रात सौन्दर्य आणि त्याबद्दलच्या संकल्पना काही प्रश्नांद्वारे स्पष्ट केल्या. यात मी मला आवडते का? असेल तर का? नसेल तर का नाही? मी सुंदर दिसण्यासाठी काय करते? माझी आवडती व्यक्ती कोण? का आवडते? या प्रश्नांवर चर्चा होऊन

सौंदर्य विषयावर विद्यार्थिनींनी सादरीकरण केले. हे सर्व विषय अतिशय सोप्या शब्दात मुलींपर्यंत पोचवताना चर्चा, गप्पा, रोल प्ले, वाद-विवाद व गोष्टी अशा विविध माध्यमांचा उपयोग केला. मुलींच्या प्रतिक्रिया खूप बोलक्या होत्या. मुलींनी न घाबरता पुढे येऊन विषयावर सादरीकरण केले. मेळाव्यात विकासिका गटातल्या सात जणींनी मार्गदर्शन केले.

---

## ए वतन, मेरे वतन

ए वतन, मेरे वतन ....दहा बारा छोटी गोड मुले व्यासपीठावरून उत्साहात हे गीत सादर करत होती. विवेक इन्स्पायर या प्रकल्पाच्या अंतर्गत अरुणाचल प्रदेशातून पुण्यात एक्सपोजर भेटीसाठी आली होती. विवेकानंद केंद्र विद्यालयाच्या अरुणाचल प्रदेश ट्रस्ट (व्हीकेव्हीएपीटी) च्या सहकार्याने विवेक प्रेरणा (vivekinspire) हा ज्ञान प्रबोधिनीचा एक प्रकल्प गेली चार वर्षे चालू आहे. देशातील विविध उदयोन्मुख क्षेत्रातल्या विद्यार्थ्यांनी यश मिळवावे यासाठी या क्षेत्रांची ओळख करून देऊन त्यांना प्रोत्साहित करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. यामध्ये अरुणाचल प्रदेशातील उच्च क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना निवडून त्यांना मार्गदर्शन केले जाते.

ह्या प्रकल्पात२०१५ मध्ये २८ विवेकानंद केंद्र विद्यालयांमध्ये मानकीकृत मानसशास्त्रीय कल चाचणी घेऊन १८० विद्यार्थ्यांची निवड केली होती. हे सर्व विद्यार्थी आता नवव्या इयत्तेत शिकत आहेत. आत्तापर्यंत त्यांच्यासाठी एका वर्षात तीन याप्रमाणे नऊ कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. भौगोलिकदृष्ट्या दूर असल्याने त्यांच्यापर्यंत पोचून तिथे असणाऱ्या कमतरता भरून काढण्याचा प्रयत्न प्रबोधिनी करत असते.

३६५ दिवस शाळेच्या चार भिंतीत राहून शिकता येत नाही ते या छोट्या कालावधीच्या अभ्यास सहलीतून साध्य होऊ शकते हा अनुभव प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीत रुजलेला आहे. त्याचा उपयोग या विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी कौशल्य प्रशिक्षणासह विविध कार्यक्षेत्रांबद्दल माहिती देऊन त्याच्या विचारांच्या आणि अनुभवांच्या कक्षा व्यापक कशा होतील हे या कार्यशाळा योजताना विचारपूर्वक केले जाते.

यावर्षीच्या अभ्यास सहलीला झिरो, इटानगर आणि रोइंग भागातील दहा शाळांमधील ३८ विद्यार्थी आणि त्यांचे पाच मार्गदर्शक सौर अग्रहायण १६ ते २७ (७ ते १८ डिसें.) या कालावधीत आले होते. घराबाहेर एवढ्या लांब जवळपास चार दिवसांचा प्रवास करून आलेली मुले दमलेली होती तरीही उत्साहात होती. वेगळा प्रदेश, जेवणातले पदार्थही वेगळे, वागण्या-बोलण्यातले वेगळेपण अशा बऱ्याच काही गोष्टी होत्या त्यामुळे काय करायचे आणि काय करायचे नाही याच्या व्यवस्थित सूचना दिल्या गेल्या. अकरा दिवसांचा भरगच्च कार्यक्रम होता. त्यात प्रथम ज्ञान प्रबोधिनीची ओळख, आयुकाला भेट, प्रज्ञा प्रबोध वर्गातील मुलांशी गप्पा, पर्वती येथील प्रज्ञा विकास उपक्रमाला भेट, पुणे शहराची फेरी, शनिवार वाड्यातील लाईट आणि म्युझिक शो, मिलिटरीचे दिव्यांग निवास, दोन दिवसाच्या अलिबागच्या भेटीत Wax Museum आणि उत्तरा पर्यावरण शाळा अशा भेटी झाल्या.

मुलांसाठी सहा कार्यशाळा योजल्या होत्या. यात मंदार फाटक यांनी संगीत, चिन्मय फाटक यांनी DESIGN आभाताई भागवत यांनी रंगकाम, प्रसाददादा बके आणि स्वानंद बर्वे यांनी फोटोग्राफी, रवींद्र गोडबोले यांनी AUTOMATA हे विषय प्रात्यक्षिकातून शिकवले आणि चिन्मय मुंगी यांनी आयसरची सफर घडवली.

समारोपाच्या सत्रात मुले त्यांच्या अनुभवांबद्दल भरभरून बोलत होती. त्यांनी शिकलेल्या कला, ते ज्या घरांमध्ये राहिले त्यांच्याबद्दलची आपुलकी त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती. त्यांना सर्व महाराष्ट्रीय पदार्थांची चव घेता यावी असे आहाराचे नियोजन केले होते आणि त्या सर्व पदार्थांची नावासह मुले आठवण काढत होती.

समारोपाच्या सत्रात मा.विवेकराव पोंक्षे यांनी या सर्व उपक्रमाचा हेतू मुलांपर्यंत पोचवला तर विवेकानंद केंद्राचे महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे संघटक मा.विश्वासजी लापालकर यांनी विवेकानंद केंद्राच्या विद्यालयातील मुलांच्या आठवणी सांगून आता या मुलांकडून काय अपेक्षा आहेत हे सांगितले. परतीच्या प्रवासाला निघालेली मुले मनात अनेक स्वप्न आणि आठवणींचा खजिना घेऊन निघाली आहेत हे जाणवत होते.

---

## ग्रामविकसन प्रभाग वार्षिक प्रशिक्षण वर्ग

या वर्षीचा ग्रामविकसन प्रभागाचा वार्षिक प्रशिक्षण वर्ग हराळी केंद्रावरती झाला. या वर्गामध्ये विविध केंद्रातील २४ सदस्य सहभागी झाले होते. भवितव्य लेख-संकल्पना व पुर्नविचार या विषयावर मा. सुभाषराव देशपांडे यांच्या सत्रानंतर ग्रामविकसन प्रभागाच्या पुणे, हराळी, अंबाजोगाई आणि साळुंब्रे या केंद्रांच्या उपस्थित सदस्यांनी आपल्या यापूर्वी लिहीलेल्या भवितव्य लेखाचे वाचन व अभ्यास केला. प्रसाददादा चिक्षे यांनी लोकसहभागामध्ये येणाऱ्या अडचणी या विषयावर प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. लोकविकासाकडून लोकसंस्काराकडे या विषयावर मा. गिरीशरावांचे आणि कामातील प्रेरणेचे सातत्य कसे टिकवायचे? याबाबत मा. लताताई भिशीकर यांचे मार्गदर्शन झाले.

अनुभवकथन सत्रामध्ये अणदूर येथील हॅलो फाउंडेशनचे डॉ. शशिकांत अहंकारी यांचे व्याख्यान झाले. वर्गात सौर ऊर्जा आणि पाणी या विषयांवरील निवडक चित्रफीती दाखविण्यात आल्या. रुद्रवाडीतांडा (ता. लोहारा) येथे फेरो सिमेंट टाकी बांधकाम आणि पाणी शुद्धीकरण प्रकल्पास भेट देण्यात आली.

## *ज्ञान प्रबोधिनी, हराळी*

**बाल विज्ञान परिषद राज्यस्तरीय अधिवेशन –** सौर अग्रहायण ९ व १० (३० नोव्हें. व १ डिसें.) या दिवशी हराळी केंद्रावर राज्यस्तरीय बाल विज्ञान परिषदेचे अधिवेशन झाले. ठाणे येथील जिज्ञासा ट्रस्ट द्वारे या उपक्रमाचे आयोजन केले जाते. राज्यभरातून एकूण ७४ प्रकल्प या स्पर्धेत सहभागी झाले. उद्घाटनास प्रमुख पाहुणे आ. सुधाताई गोवारीकर आणि खासदार डॉ. रवी गायकवाड उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनी हराळी विद्यालयातून सांडपाणी शुद्धीकरण या प्रकल्पाचे सादरीकरण या स्पर्धेत झाले.

**ट्रॅक्टर चालक प्रशिक्षण प्रकल्प उद्घाटन** – हराळी भागातील ग्रामीण युवक युवतींसाठी कृषी विद्यालयातर्फे 'कृषी औजारे वापर व देखभाल दुरुस्ती प्रशिक्षण प्रकल्प' सुरू होतो आहे. या प्रकल्पांतर्गत ट्रॅक्टर चालन व दुरुस्ती देखभाल प्रशिक्षण प्रकल्पाचे उद्घाटन सौर अग्रहायण २३ (१४ डिसें.) रोजी हराळी केंद्रावर झाले. कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी तुळजापूर येथील कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक श्री. सचिन सूर्यवंशी आणि मॅसेफर्ग्युसन कंपनीतील विविध विभागातील तज्ञ आले होते. मॅसेफर्ग्युसन तर्फे ट्रॅक्टर संबंधी सादरीकरण व वेगवेगळ्या अश्वशक्तीच्या ट्रॅक्टर्सची प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली होती. यामध्ये कृषी विद्यालयातील विद्यार्थी आणि परिसरातील शेतकरी सहभागी झाले.

**प्रज्ञा विकास –** सौर कार्तिक २६ ते अग्रहायण ४ (१७ ते २५ नोव्हें.) या काळात प्रज्ञा विकास उपक्रमातर्फे गावांमध्ये दिवाळी सुट्टीतील एक दिवसीय शिबिरे आयोजित करण्यात आली होती. एकत्रित शेतावर जाणे, वनभोजन, अभिव्यक्ती सादरीकरण, भेळ बनवणे इत्यादी कृती सत्र या उपक्रमात आयोजित केली होती. तावशीगड, सालेगाव, उदतपूर, खेड, हिप्परगा, धानुरी आणि वडगाव या गावांतील एकूण १९० विद्यार्थ्यांनी या शिबिरांमध्ये सहभाग घेतला. रविवारची हॉबी-हॉलिडे सत्र सुद्धा सुरू झाली आहेत. आजूबाजूच्या गावातील विद्यार्थी विद्यार्थिनी आपणहून उत्साहाने रविवारी केंद्रावर येत आहेत. चित्रपट दाखवणे, खेळ, संगणक शिक्षण, स्कॉलरशिप तयारी इत्यादी सत्र आयोजित करण्यात येतात.

## *स्त्री शक्ती प्रबोधन (शहरी)*

**विद्याव्रत संस्कार –** सौर अग्रहायण १३ ते २० (४ ते ११ डिसें.) या कालावधीत ताम्हिणीतील श्री विंझाईदेवी हायस्कूलमध्ये इ. ८वीसाठी व्याख्यानमाला व ९वी साठी सर्व विषयांवर पाठपुरावा सत्रे झाली. सौर अग्रहायण २१ (१२ डिसें.) ला संस्कार झाला. व्रतार्थींची संख्या ४२ होती.

## *प्रज्ञा मानस संशोधिका*

**ओळख स्पर्शाची :** या प्रकल्पात आत्तापर्यंत पुणे जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये १५ प्रशिक्षणे झाली. सौर कार्तिक २७ (१८ नोव्हे.) रोजी वेल्हे येथे युवती, किशोरी आणि अंगणवाडी सेविका ५८ तसेच सौर अग्रहायण १० (१ डिसे.) रोजी सरस्वती विद्या मंदिर, तळेगाव येथे २५ शिक्षक व शिक्षिका, सौर अग्रहायण १७ (८ डिसे.) पृथ्वीराज मेमोरियल इंग्लिश मिडीयम स्कूल, लोणी-काळभोर येथे ९० शिक्षकांची उपस्थिती होती. एकूण पंधरा ठिकाणी मिळून ६०९ जणांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. प्रशिक्षित सदस्य साधारण १०० तासिकेंच्या माध्यमातून १४,४१९ जणांपर्यंत पोचले.

सौर कार्तिक २४ व २५ (१५,१६ नोव्हें.) ला तासगांव येथील आनंद सागर विद्यालयामध्ये शिक्षक प्रशिक्षणाची (शालेय वातावरण समृद्धी SCAN-२) दोन दिवसीय कार्यशाळा झाली. पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक मधील ३५ शिक्षक व माध्यमिक आणि उच्च-माध्यमिक मधील १५ अशा एकूण ५० शिक्षकांनी या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला. क्षमता विकसन विभाग व मनोमापनशास्त्र विभाग यांनी मिळून ही कार्यशाळा घेतली.

## *ज्ञान प्रबोधनी, प्रशाला (पुणे)*

अभिनंदन!!! -- कै. लक्ष्मीबाई रानडे वक्तृत्व स्पर्धेत इ. ८वीतील चि. कृशानु पत्की यास द्वितीय व इ. ९वीतील चि. कौस्तुभ जोशी यास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. कै. शंकरराव मासुळकर स्मृती चषक जलद बुद्धिबळ स्पर्धेत इ. ८वीतील चि. कुणाल कुरंदळे याने ११ वर्षाखालील गटात सात डावांपैकी पाच डाव जिंकत व दोन डाव बरोबरीत सोडवत प्रथम क्रमांक मिळवला.

## *ज्ञान प्रबोधनी, निगडी*

**वास्तू विस्तार पूजा कार्यक्रम :** सौर १२ अग्रहायण (३ डिसें.) रोजी स. ११वा. वास्तू विस्तार पूजेचा कार्यक्रम ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्रात प्रमुख अतिथी मा. नितीनभाई कारिया यांच्या उपस्थितीत झाला. मा. यशवंतराव लिमये यांनी पौरोहित्य केले. या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर, देणगीदार, केंद्रीय सदस्य, पालक महासंघाचे सदस्य, माजी विद्यार्थी व अग्रणी विद्यार्थी गट उपस्थित होते. त्यानंतर निगडी केंद्राचे उपप्रमुख श्री. मनोजराव देवळेकर यांनी बांधकाम विस्ताराविषयी मांडणी केली. बऱ्याच विभागांना शैक्षणिक व इतर उपक्रमांसाठी जागा अपुरी पडत असल्याने मनोहर सभागृहाच्या वर आणखी दोन मजले वाढवून सोळा वर्ग खोल्या व दोन कार्यालये बांधायची आहेत.

**गुरुकुल विभाग :** मातृभूमी परिचय शिबिरे प्रत्येक वेळी नवनवीन अनुभव अध्यापकांना, विद्यार्थ्यांना देत असतात तशीच ही यावर्षीची

शिबिरे अनेक अनुभव देऊन गेली. इयत्ता ५वी-रानमळा खेड-तालुका, इ.६वी-रोहा राजगड-जिल्हा, इ.७वी-धारणी-अमरावती-जिल्हा, इ.९वी-हिमाचल प्रदेश, दिल्ली, इ.१०वी-बिहार, नेपाळ येथे गेले होती. प्रथमच आई बाबांपासून लांब राहण्याचा अनुभव व गावात जाऊन गावभेटी, आठवडी बाजार याचा अनुभव ५वीच्या विद्यार्थ्यांनी घेतला तर ६वी ने आकाश दर्शन, रायगड चढणे, चुल बनवण्याचा अनुभव घेतला. ७वीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी लोकजीवनाचा परिचय करून घेतला तसेच व्याघ्रप्रकल्प व बांबू प्रकल्पाला भेट देऊन शिबिर यशस्वी केले. तर मेरीडाईन या औषधे तयार कण्याच्या कंपनीला, लालकिल्ला, राष्ट्रपती भवन तसेच मा. श्री. लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेतली ती ९वीच्या विद्यार्थ्यांनी. १०वी चे विद्यार्थी प्राचीन भारतीय शिक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या बिहारचा ऐतिहासिक, सामाजिक व भौगोलिकदृष्ट्या अभ्यास करून आले.

## *ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर*

**विद्यार्थी यश –** सौर कार्तिक २६ व २७ (१७ व १८ नोव्हे.) रोजी राज्यस्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धा झाली. यात १७ वर्षाखालील मुलींच्या गटात कु. सई संग्रामसिंह पवार हिचा सहभाग होता. तिला (सहभाग, वैयक्तिक-तृतीय, सांघिक - द्वितीय) साठी प्रमाणपत्र व पदक प्राप्त झाले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूर तर्फे घेण्यात आलेल्या एकपात्री अभिनयासाठी जैद शेख याला ३ उत्तेजनार्थ बक्षिसे मिळाली (स्मरणिका प्राप्त). हा कार्यक्रम सौर कार्तिक १५ (५ नोव्हे.) रोजी फडकुले सभागृह येथे झाला.

**किशोरी विकास –** सौर अग्रहायण १ (२२ नोव्हें.) रोजी सिद्धेश्वर प्रशाला, कुमठे येथे इ. ७वी व ८वीच्या विद्यार्थिनींचे आणि सौर कार्तिक २८ (१९ नोव्हें.) रोजी सह्याद्री प्रशालेत तीन तासांची शिबिरे घेण्यात आली. सौर अग्रहायण ९ (३० नोव्हें.) रोजी सहस्त्रार्जुन प्रशालेत इ. ८वी व ९वीचे तीन तासाचे शिबिर घेण्यात आले. या शिबिरात प्रामुख्याने ध्यान, पद्य, वाचन, लेखाचे वाचन करण्यात आले. खेळ, कलाकौशल्य, पथनाट्य, स्वच्छतेचे महत्त्व, मोबाईलचा अतिवापर, पाणी समस्या, वेळेचे महत्त्व, बालविवाह, शिक्षणाचे महत्त्व इ. घेतले. एकूण ८० विद्यार्थिनींचा सहभाग होता.

## *संत्रिका*

**वैचारिक –** 'उत्क्रांती' या विषयावरच्या सत्रांच्या मालिकेतील सौर अग्रहायण १० (१ डिसें.) रोजी असीम औटी यांचे 'Introduction to Evolutionary Game Theory (EGT)' या विषयावर व्याख्यान झाले. यातीलच पुढील सत्र 'गोफ जन्मांतरीचे' या डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर यांच्या पुस्तकाबद्दलची मांडणी सौर अग्रहायण २४ (१५ डिसें.) रोजी माधुरीताई कोटिभास्कर यांनी केली.

## *शैक्षणिक उपक्रम संशोधिका*

**वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र :** सौर कार्तिक २१ ते २६ (१२ ते १८ नोव्हें.) या कालावधीमध्ये चिपळूण येथे ज्ञान प्रबोधिनी व चतुरंग प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक प्रेरणा जागृती वर्ग याचा दुसरा टप्पा घेण्यात आला. या शिबिरामध्ये चिपळूण व त्याच्या आसपासच्या परिसरातील वेगवेगळ्या शाळांमधून ४० शिक्षक सहभागी झाले होते. कृतीयुक्त शिक्षण पद्धतीवर भर देत शिबिरामध्ये प्रकल्प पद्धती, बौद्धिक विकसन, शिक्षण व तंत्रज्ञान, मोकळ्या तासांचा कल्पक वापर, संकल्प शक्तीचा विचार, समर्थ भारत, कलारसस्वाद अशी सत्रे घेण्यात आली.

सौर अग्रहायण २० ते २४ (११ ते १५ डिसें.) या कालावधीत रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रल व ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक प्रशिक्षण वर्ग झाले. इंग्रजी, गणित, विज्ञान प्राथमिक शिक्षण पद्धती व माध्यमिक पद्धती असे पाच वेगळे विषय घेण्यात आले. त्या त्या विषयासाठीचे ७ ते ८ शिक्षक रोज सहभागी होते तसेच प्राथमिक शिक्षण पद्धती या विषयासाठी पंधरा शिक्षकांचा सहभाग होता.

सौर अग्रहायण ७ (२८ नोव्हें.) रोजी केपीआयटीच्या ३२ अभियंत्यांचे विज्ञान संकल्पना प्रशिक्षण झाले. इ.८वी साठी 'चुंबकत्व' व इ.९वी साठी 'प्रकाश' या विषयांवर आधारित हे प्रशिक्षण होते. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील पंधरा शाळा व मुळशी तालुक्यातील पाच शाळा अशा एकूण वीस शाळांमध्ये जाऊन हे अभियंते विज्ञान संकल्पना शिकविणार आहेत. आठवी व नववीसाठी प्रत्येकी वीस असे एकूण ४० संच तयार करून दिले आहेत. सदर विज्ञान संकल्पना इ.८वी व इ. ९वीच्या अभ्यास क्रमावर आधारित आहेत.

**शैक्षणिक साधन केंद्र :** ज्ञान वाहिनी उपक्रमामध्ये Jammu Kashmir Knowledge Network (JKKN) बरोबर तेथील सरकारी शाळांतील इ. ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन सत्र online घेण्यात येते. यावर्षी सोळा सत्रे घेण्यात आली. Development of personality for a successful career, Recognise potential Abilities and Aptitude, Career as CA, Career in Banking, Career in Design, Career in Civil Services, Career as Company Secretary,Career in Animation, Career in Tourism, Career in journalism & mass communication या विषयावर सौगंध देशमुख, पराग कुलकर्णी, मयुरेश सोहोनी, ध्रुव पाकणीकर, रवी पालेकर, नेहा अगरवाल, सौम्या भट्टाचार्य, राजेश खेले, निशिता घाडगे आणि संजय तांबट या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. ११३ शाळांतील ३००० विद्यार्थी यात सहभागी झाले.

## स्पर्धा परीक्षा केंद्र

**सायकल सहल :** स्पर्धा परीक्षा केंद्राची ही चौथी सायकल सहल. सौर अग्रहायण ५ (२६ नोव्हें.) रोजी सायकलवर शिवापूरला जायचे ठरले. जाऊन-येऊन ५५ कि.मी. चा प्रवास तीन मुली आणि वीस मुले अशा २३ जणांनी पूर्ण केला. कात्रज-कात्रज घाट-मार्गे विद्यार्थी शिवापूरला प्रबोधिनीच्या कृषी तंत्र शाळेत पोचले. तिथे निवृत्त प्राचार्य श्री. संजीव तागडे यांनी शाळेबद्दल एकूण माहिती दिली. विद्यार्थ्यांबरोबर सायकलिंगला निवृत्त लेफ्टनंट कमांडर श्री. प्रशांत सर आले होते. ते नौदलात असताना मुंबईवर २००८ चा अतिरेकी हल्ला झाला होता, त्या सर्व घटनेचा त्यांचा अनुभव तसेच भारतीय नौदल, पोलीस आणि इतर फोर्सचा यांनी हल्ल्यात कसा प्रतिकार केला इ. गोष्टींबद्दल त्यांनी माहिती दिली.

**वेल्हा-आंबवणे अभ्यास सहल :** सौर अग्रहायण ८ (२९ नोव्हें.) रोजी सेवा SEVA (Self Enhancement through Voluntary Activities) या उपक्रमा अंतर्गत अभ्यासिकेतील विद्यार्थिनींसाठी वेल्हे-आंबवणे येथील विविध सामाजिक संस्थांना भेटी अशी एक अभ्यास सहल आयोजित केली होती. यामध्ये २७ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. ग्रामीण जीवन व तेथील समस्यांचा प्रशासकीय दृष्टीकोनातून अभ्यास असा या दौऱ्याचा उद्देश होता.

## ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

**स्नेहसंमेलन :** सौर अग्रहायण २४ (१५ डिसें.) रोजी विद्यालयात आनंद मेळावा व स्नेहसंमेलन घेण्यात आले. विक्री कौशल्य अनुभवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आनंद मेळाव्यात विविध स्टॉल मांडून विक्री केली व इतर मुलांनी आनंद मेळाव्याचा आनंद घेतला. याचे उद्घाटन मा. संचालक गिरीशराव बापट, मा. दत्तात्रय तरकसे-लघुउद्योजक, मा. कांतिलालजी खिंवसरा यांच्या हस्ते झाले. सभेच्या कार्यक्रमास वरीष्ठ मान्यवरांसह निलेश राक्षे, सरपंच उज्ज्वला आगळे, ग्राम पंचायत सदस्य, पोलीस पाटील उपस्थित होते. स्नेहसंमेलनात नृत्य, गीत, विनोदी व सामाजिक नाटके, पोवाडा, एकपात्री नाटक असे २१ कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमास ५०० हून अधिक पालक उपस्थित होते.

## विस्तार केंद्र, डोंबिवली

**विशेष उपक्रम :** संवादिनी एकत्रित कार्यक्रम - सौर ११ अग्रहायण (२ डिसें.) रोजी कानविंदे सभागृहात संवादिनीचा तिसरा एकत्रित कार्यक्रम झाला. यात 'अभिनव स्पर्धां'चे आयोजन दुर्गा गटाने केले होते. समूहगायन स्पर्धेत एक प्रबोधन गीत व एक बोलीभाषेतील/प्रादेशिक गीत म्हणून त्यातील एका गीतावर सादरीकरण करण्यात आले. स्पर्धेमध्ये गटातील प्रत्येकीने भाग घेतलाच पाहिजे ही अट ठेवली होती. पाच गटांनी स्पर्धेत भाग घेतला. त्यांनी निवडलेल्या गीतांमध्ये वैविध्य होते -- बहिणाबाई गट : शुभ्र सुगंधित पुष्पे आणि गुजराथी गीत (सादरीकरण - गरबा व एकीकडे चित्रकला), जिजामाता गट -- गलत मत कदम उठाओ आणि शेतकरी गीत (सादरीकरण - नृत्य), अहिल्याबाई गट १ -- आव्हान हे ज्योतींना आणि बंगाली गीत (सादरीकरण - नृत्य), अहिल्याबाई गट २ -- डोळे उघडून बघा गड्यांनो आणि हरियाणवी गीत (सादरीकरण), दुर्गा गट - या माझ्या भारत देशी (सादरीकरण-डीजीटल) आणि वऱ्हाडी गीत.

**कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर :** सौर २९ कार्तिक (२० नोव्हें.) रोजी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. डोंबिवलीतील २२, बदलापूर मधील सहा व ठाण्यातील चार अशा एकूण ३२ कार्यकर्त्यांनी यात सहभाग घेतला. पुण्याहून शिल्पाताई कुलकर्णी, प्रणिताताई जगताप, निगडीहून अस्मिताताई इनामदार प्रशिक्षण घेण्यासाठी आल्या होत्या. कार्यकर्त्यांना प्रबोधिनीच्या कार्यपद्धतीचा, तत्त्वसप्तकाचा परिचय व्हावा यासाठी प्रशिक्षण घेण्यात आले. शेवटच्या सत्रात प्रबोधिनीच्या कामाची वैशिष्ट्ये रोल-प्लेच्या माध्यमातून सांगितली.

**विस्तार कार्य , ठाणे : जोपासना गट** - सौर ४ अग्रहायण (२५ नोव्हें.) या दिवशी ठाणे शहरात विरासत चालणे (Heritage Walk) हा उपक्रम जोपासना गटासाठी घेण्यात आला. एकूण तेरा मुले व पाच मार्गदर्शिका मावश्या होत्या. इतिहासाचे जाणकार असलेले श्री. सदाशिव टेटविलकर ह्यांचे मार्गदर्शन मुलांना लाभले. 'तुमचे आमचे ठाणे' हे ठाणे शहरावर लिहिलेले त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे.

## स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

युवतींचे साहस शिबिर वेल्ह्यामध्ये झाले. त्यासाठी हराळीहून सोळा, नागरवस्ती पुण्यातून सहाजणी , शिवापूर-वेल्ह्यातील सतरा जणी अशा एकूण ३९ युवतींनी सहभाग घेतला. यामध्ये 'साहस' या विषयाला धरुन व्याख्याने झाली. शिबिरात गटकार्याचे सत्र झाले तेव्हा कमावून जेवण करणे, बस थांबा स्वछ कारणे, प्रवाशांचे स्वागत करणे अशी गटकार्ये युवतींनी प्रथमच केली. या शिबिरामध्ये 'ओळख स्पर्शाची'चे प्रशिक्षक प्रशिक्षण पुण्यातील संवादिनी सदस्यांनी घेतले आणि शेवटी सगळा गट साहस म्हणून पुरंदर गडावर जाऊन आला. गटाने गडावर थंडीत धुके व पावसाचा अनुभव घेतला.

या महिन्यात किशोर विकासाचे उपक्रम घेत असणाऱ्या शाळेला भेट द्यायला कॅडेन्स कंपनीचे वीसजण रोटरी क्लब ऑफ पुणे, गांधी भवन यांच्या सोबत आले होते. त्यांनी कुरूंगवडी मध्ये सहा शाळांना व वेल्ह्यामध्ये चार शाळांना खेळाचे साहित्य व शास्त्रीय प्रयोग करण्यासाठीचे साहित्य भेट दिले. ह्या सगळ्या १० शाळा प्रबोधिनीचे किशोरी विकास उपक्रम जिथे चालतात अशा होत्या.(वेल्हे, आसनी, विंझर, दापोडे, मांडवली, वांगणी वाडी, कुरुंगवडी, कल्याण, कुसगाव, माळेगाव) एकूण २.५० लक्ष रुपयांची मदत केली.

एक कार्यक्रम कुरुंगवडी येथे झाला. तिथे कुरुंगवडीशिवाय कल्याण, कुसगाव, माळेगांव, सोंडे या शाळेचे प्रतिनिधी आले होते तर वेल्ह्यात विंझर, दापोडे आसनी या शाळेचे प्रतिनिधी आले होते. कॅडेन्स कंपनीतून अश्लेशा करंदीकर व १९ कार्यालयीन सदस्य गाडी करून आले होते. रोटरी क्लब ऑफ पुणे, गांधी भवनच्या आजी प्रेसिडेंट अमृता देवगावकर व माजी प्रेसिडेंट गणेश जाधव व धोत्रे आले होते.

# ✻ सौर अग्रहायण १९४० मधील उपक्रमांची छायाचित्रे ✻




ज्ञान प्रबोधिनी, हराळी : बाल विज्ञान परिषद राज्यस्तरीय अधिवेशन




''पाण्याची गोष्ट'' व डोंबिवलीकरांच्या अनुभवाची पुस्तिका यांचे प्रकाशन



ज्ञान प्रबोधिनी, हराळी : ट्रॅक्टर चालक प्रशिक्षण प्रकल्प उद्घाटन



ग्राम विकसन प्रभाग प्रशिक्षण वर्ग क्षेत्रभेट

स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण :
युवतींचे साहस शिबिर
→

